# महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग

## वार्षिक अहवाल
## २००३ - २००४

# महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग

## तिसरा वार्षिक अहवाल

## २००३—२००४

# अनुक्रमणिका


| | | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | प्रस्तावना | |
| १ | प्रास्ताविक .. .. .. | १ |
| २ | आयोगाने हाताळलेल्या तक्रारी .. .. .. | २ |
| ३ | निकाली काढलेल्या प्रकरणांचे वर्गीकरण .. .. .. | २ |
| ४ | अटक झालेल्या व्यक्तींचे अधिकार .. .. .. | ३ |
| ५ | प्रशासकीय व न्यायिक सहाय्य .. .. .. | ६ |
| ६ | आयोगाने निर्णय दिलेल्या दृष्टांतयुक्त प्रकरणे .. .. .. | ७ |

## प्रस्तावना

मानव अधिकार सर्व साधारणपणे स्वीकारल्यानंतर सन १९४८ साली जागतिकस्तरावर अस्तित्वात आला. आमच्या घटनेने निरनिराळ्या प्रकाराने हक्कांचे संरक्षण केलेले आहे. या संदर्भात राज्य मानवी हक्क आयोग सरकारी नोकरांकडून मानवी हक्कांचे उल्लंघन थांबविण्याकरिता प्रयत्नशील आहे. गेल्या वर्षापेक्षा या वर्षामध्ये ही प्रकरणे वाढलेली आहेत. मानवाधिकार संरक्षणासाठी आयोगाने न्यायालयीन कार्यवाही आणि पोलीस ठाणे, तुरुंग, बंदीगृह, निरीक्षणगृह यांना अचानक भेटी दिल्या. मानव अधिकार क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या निरनिराळ्या संस्थांनादेखील प्रोत्साहन दिले. आयोगाने प्राप्त सर्व आणि प्रत्येक तक्रारीचे निरीक्षण केले. जन्मतः प्राप्त झालेले अधिकार व घटनेने हमी दिलेले मुलभूत अधिकार नाकारण्यात आलेल्या व्यक्तीच्या भेटीगाठी घेतल्यामुळे आयोगाचा उद्देश सफल होत आहे. मानवी हक्क आयोग मुलभूत हक्कांचे विकास करण्यासाठी अनुकरण करते. आम्ही आमचा २००३-२००४ सालचा अहवाल विधानसभेत ठेवण्यासाठी मानव अधिकार संरक्षण अधिनियम, १९९३ च्या कलम २८ अन्वये शासनास सादर करीत आहोत.

सध्याचे सदस्य २००६-२००७ साली रूजू झाले व अध्यक्ष २००७-२००८ साली आयोगामध्ये रुजू झाले. त्यानंतर या वार्षिक अहवालाचे शिल्लक राहिलेले काम प्राधान्याने हाती घेऊन ते पूर्ण करून सादर करण्यात आले.

न्यायाधीश श्री. क्षितीज व्यास

अध्यक्ष

| | | |
|---|---|---|
| न्यायाधीश श्री. व्ही. जी. मुन्शी | श्री. टी. सिंगारवेल | श्री. सुभाष लाला |
| सदस्य | सदस्य | सदस्य |

## प्रकरण- १

**प्रास्ताविक :**

महाराष्ट्र राज्य मानवी अधिकार आयोगाचा वार्षिक अहवाल एप्रिल २००३ ते मार्च २००४ या वर्षाशी संबंधित आहे. आयोग ६ मार्च २००१ पासून कार्यान्वित झाल्यानंतर आयोगाने मार्च २००४ पर्यंत आपल्या कार्याची चार वर्षे पूर्ण केली आहेत.

१.२. या वर्षी आयोगाचे सदस्य व वरिष्ठ अधिकारी यांच्यात बदल झाले नाहीत. अध्यक्षांची जागा यावर्षी रिक्त राहिली. या वर्षी आयोगाचे सदस्य व वरिष्ठ अधिकारी खालीलप्रमाणे होते.

| | |
|---|---|
| न्यायाधीश ए. डी. माने. | सदस्य व कार्यकारी अध्यक्ष |
| डॉ. व्ही. एस. चिटणीस | सदस्य |
| श्री. एम. आर. पाटील | सदस्य |
| श्री. सी. एल. थुल | सदस्य |
| श्रीमती रंजना सिन्हा (आय. ए. एस.) | सचिव |
| श्री. डी. एस. पुरोहित | प्रबंधक |
| श्री. सुभाष आवटे (आय. पी. एस.) | स्पेशल आय. जी. पी. मुख्य, तपास शाखा. |

१.३. श्री. जे. आर. संगम, पोलीस अधिक्षक यांनी प्रबंधक म्हणून अतिरिक्त कार्यभार २२ मे २००३ पर्यंत सांभाळला. त्यानंतर श्री. डी. एस. पुरोहित, अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश, मालेगाव हे, आयोगामध्ये प्रबंधक म्हणून आले. श्रीमती रश्मी नगरकर जानेवारी २००४ मध्ये संशोधन अधिकारी म्हणून आयोगामध्ये आल्या. श्री. पुरोहित यांची १ मार्च २००४ रोजी पालघरला बदली झाल्यानंतर, श्रीमती रश्मी नगरकर, संशोधन अधिकारी यांनी प्रबंधक म्हणून अतिरिक्त कार्यभार सांभाळला. या अहवालाच्या काळात शासनाच्या शा. नि. क्र. एच. आर. सी./११२००२/ २८१/पोल. १४ दिनांक १० मार्च २००४ रोजी सहायक प्रबंधक, निम्न श्रेणी लघुलेखक, लिपिक व शिपाई अशी चार पदे अटक झालेल्यांच्या हक्कासंदर्भातील उपसमितीकरिता करार तत्वावर निर्माण केल्या. यामुळे ३१ मार्च २००४ रोजी एकूण मंजूर पदे ४८ पासून ५२ पर्यंत वाढली. त्यापैकी ४१ जागा भरल्या गेल्या, व ११ जागा रिक्त होत्या, त्यामध्ये वरील डी. के. बासू समितीच्या चार पदांचा समावेश आहे.

या काळात कार्यालयाच्या स्थळामध्ये बदल झाला नव्हता. शासनाच्या आदेश शा. नि. क्र. एच. आर. सी./ संकिर्ण/१४८/पोल.१४, दिनांक २९ मार्च २००३ अन्वये शासनाने सध्याच्या कार्यालयाचे नुतनीकरण करण्यासाठी ६५.०७ लाख खर्चासाठी प्रशासकीय मान्यता दिली.

(शा.म.मु.) वाय—१२६८-३ (१०००—१२-२००९)

# प्रकरण-२

## आयोगाने हाताळलेल्या तक्रारी :

या प्रकरणात आयोगाने हाताळलेल्या तक्रारींचे (विस्तृत सांख्यिकी) विश्लेषन करीत आहे. सामान्य प्रकरणे, ताब्यातील मृत्यु प्रकरणे व स्वयंचलित प्रकरणे इ.

२.२. यावर्षी आयोगापुढे दाखल केलेल्या तक्रारींमध्ये विलक्षण वाढ झाली आहे. सन २००३-२००४ मध्ये प्राप्त झालेल्या तक्रारींचे प्रमाण खालीलप्रमाणे आहे—

| वर्ष | प्राप्त झालेल्या तक्रारींची संख्या | निर्णयात काढलेल्या तक्रारींची संख्या |
|---|---|---|
| २००१-२००२ | १४५४ | ५३८ |
| २००२-२००३ | २१५३ | १६४५ |
| २००३-२००४ | २२२६ | १६८६ |

२.३. आयोगापुढे दाखल झालेल्या तक्रारीमध्ये दिवसेंदिवस विलक्षण वाढ होत आहे. २००१-२००२ ते २००३-२००४ या कालावधीत तक्रारीमध्ये वाढ झाल्याचे वरील तक्त्यावरून दिसते. सन २००३-२००४ यावर्षी २२२६ प्राप्त झालेल्या तक्रारीपैकी, एकूण १६८६ प्रकरणे निकालात काढली गेली. यावरून महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाच्या कार्याबाबत सामान्य लोकांपर्यंत जागृती निर्माण झालेली दिसून येते.

सन २००३-२००४ यावर्षी ९१ प्रकरणे तपास शाखेकडे पोलीस तपासासाठी पाठविण्यात आली. मागील वर्षीच्या उर्वरित प्रकरणांची संख्या ४२ असून त्यापैकी ७० प्रकरणांचा तपास पूर्ण करून त्याचा अहवाल आयोगास सादर केला. आणि ६३ प्रकरणे तपासात आहेत.

२.४. अहवालाच्या यावर्षी, आयोगाने एकूण २१७ ताब्यातील मृत्यु प्रकरणे नमूद केले आहेत.

| वर्ष | ताब्यातील मृत्युबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींची संख्या |
|---|---|
| २००१-२००२ | ११९ |
| २००२-२००३ | २१८ |
| २००३-२००४ | २१७ |

| वर्ष | स्वयंचलित दखल घेतलेल्या प्रकरणांची संख्या |
|---|---|
| २००१-२००२ | ०५ |
| २००२-२००३ | २२ |
| २००३-२००४ | १७ |

## निकाली काढलेल्या प्रकरणांचे वर्गीकरण-

वर नमूद केल्याप्रमाणे २००३-०४, यावर्षी आयोगाने १६८६ प्रकरणे निकाली काढले आहेत. त्यापैकी ८९५ प्रकरणे प्रथमदर्शी निकाली काढली, २६४ प्रकरणे संबंधित अधिकाऱ्याकडून अहवाल प्राप्त झाल्यावर बंद केली. २९१ प्रकरणे संबंधित अधिकाऱ्याकडून आयोगास अहवाल प्राप्त झाल्यावर व बाजू ऐकून घेतल्यावर बंद केली. २००३-२००४ या संपूर्ण वर्षामध्ये आयोगाने २३६ प्रकरणांमध्ये निर्देश विविध विभागास दिले आहेत.

## प्रकरण- ३

**अटक झालेल्या व्यक्तींचे अधिकार :**

डिसेंबर २००१ मध्ये, आयोगाने अटक झालेल्या व्यक्तींच्या अधिकारावर उपसमितीची रचना केली, यासाठी की ज्यामुळे उच्चतम न्यायालयाने डी. के. बासू विरूद्ध पश्चिम बंगाल राज्य यामध्ये दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन होण्यासाठी निरीक्षण आणि देखभाल केली जावी.

३.२. यावर्षी उप समितीच्या रचनेमध्ये बदल झाला नाही.

| | |
|---|---|
| श्री. एम. आर. पाटील<br>सदस्य, एम. एस. एच. आर. सी. | उप समितीचे अध्यक्ष |
| डॉ. व्ही. एस. चिटणीस<br>सदस्य, एम. एस. एच. आर. सी. | सदस्य |
| श्री. सी. एल. थुल<br>सदस्य, एम. एस. एच. आर. सी. | सदस्य |
| श्री. पुरोहित<br>प्रबंधक, एम. एस. एच. आर. सी. | सचिव |

डी. के. बासू प्रकरणामध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन होत आहे की नाही यावर लक्ष ठेवणे व राज्यातील पोलीस ठाण्यावर आकस्मिक भेटी देऊन मार्गदर्शक तत्त्वांचे पालन होते किंवा नाही, हे पाहणे या उप समितीचे मुख्य कार्य आहे. त्याप्रमाणे उप समितीने राज्यातील कित्येक पोलीस ठाण्यावर आकस्मिक भेटी दिल्या आहेत. अहवालवर्षी खालील २१ पोलीस ठाण्यावर भेटी दिल्या आहेत.

| पोलीस ठाण्याचे नाव | जिल्हा | जिल्हा भेटीची तारीख |
|---|---|---|
| १. बंड गार्डन पोलीस ठाणे | पुणे | २ एप्रिल २००३ |
| २. लश्कर पोलीस ठाणे | पुणे | २ एप्रिल २००३ |
| ३. डेक्कन जिमखाना पोलीस ठाणे | पुणे | २ एप्रिल २००३ |
| ४. चतुर्शृंगी पोलीस ठाणे | पुणे | २ एप्रिल २००३ |
| ५. औंद आउटपोस्ट पोलीस ठाणे | पुणे | २ एप्रिल २००३ |
| ६. शेगांव पोलीस ठाणे | बुलढाणा | १६ एप्रिल २००३ |
| ७. गणेशपेठ पोलीस ठाणे | नागपूर | ८ मे २००३ |
| ८. राजापूर पोलीस ठाणे | रत्नागिरी | २३ मे २००३ |

| पोलीस ठाण्याचे नाव | जिल्हा | जिल्हा भेटीची तारीख |
|---|---|---|
| ९. कोल्हापूर सिटी पोलीस ठाणे | कोल्हापूर | २३ ऑगस्ट २००३ |
| १०. देवली पोलीस ठाणे | वर्धा | ११ सप्टेंबर २००३ |
| ११. सिटी पोलीस ठाणे | वर्धा | ११ सप्टेंबर २००३ |
| १२. जेल रोड पोलीस ठाणे | सोलापूर | १२ ऑक्टोबर २००३ |
| १३. मिरारोड पोलीस ठाणे | मुंबई | ४ जानेवारी २००४ |
| १४. मालाड पोलीस ठाणे, झोन. ११ | मुंबई | ४ जानेवारी २००४ |
| १५. भंडारा पोलीस ठाणे | भंडारा | १७ जानेवारी २००४ |
| १६. विश्रामबाग पोलीस ठाणे | पुणे | १२ मार्च २००४ |
| १७. चेंबूर पोलीस ठाणे | मुंबई | २२ मार्च २००४ |
| १८. हिंगना पोलीस ठाणे | नागपूर | २६ मार्च २००४ |
| १९. सिटी चौक पोलीस ठाणे | औरंगाबाद | २७ मार्च २००४ |
| २०. क्रांती चौक पोलीस ठाणे | औरंगाबाद | २७ मार्च २००४ |
| २१. एम.आय. डी. सी. सिडको पोलीस ठाणे | औरंगाबाद | २७ मार्च २००४ |

३.३. पोलीस ठाण्याला भेटीच्यावेळी, अटक संबंधी सर्व माहिती, वैद्यकीय परीक्षा, व्यक्तीच्या अटकेविषयी नातेवाईकांना दिलेल्या माहितीबद्दल व इतर परीक्षण केले गेले. सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वाप्रमाणे अटक मेमोंचे सुद्धा निरीक्षण केले गेले की, अटक व्यक्तींची सही नोंदपटावर घेतलेली आहे काय व साक्षीदाराने साक्ष दिली आहे काय व त्यावर अटक करणाऱ्या अधिकाऱ्याची स्वाक्षरी आहे काय याचे निरीक्षण केले. उप समितीने दिलेली मते व शिफारशी यांचे सारांश खालीलप्रमाणे आहे.

असे निरीक्षणात आले की, जवळ जवळ जास्तीत जास्त पोलीस ठाण्यामध्ये निर्देशांचे पालन केले जात आहे. परंतु पुणे व नागपूरला भेटी दिल्या त्यावेळी काही केसेसमध्ये अटक मेमो अटक केलेल्याच्या स्वाक्षरी नसलेले होते.

हिंगना पोलीस ठाण्याला जेव्हा भेट दिली त्यावेळी अटक मेमो उपलब्ध नव्हते. पोलीस ठाण्याने असे स्पष्टीकरण दिले की अटक मेमो व इतर कागदपत्र चौकशी अधिकाऱ्याजवळ उपलब्ध असू शकतील जो भेटीच्यावेळी हजर नव्हता. नागपूर पोलीस अधीक्षक ग्रामीण यांच्याकडून स्पष्टीकरण मागितले गेले. परंतु असे सूचित केले गेले की, जेव्हा अटक व्यक्ती पोलीस ठाण्याच्या ताब्यामध्ये असते, असे कागदपत्र नेहमी पोलीस ठाण्यामध्ये उपलब्ध असले पाहिजे. पोलीस अधीक्षकाने ते निश्चित केले पाहिजे.

उप समितीच्या असे निदर्शनास आले की, सर्वोच्च न्यायालयाच्या ११ मार्गदर्शक सूचना जवळ जवळ सर्व पोलीस ठाण्यामध्ये दर्शविल्या आहेत. काही पोलीस ठाण्यामध्ये सूचना प्रामुख्याने दर्शविल्या गेल्या नाहीत. काही

जागी, जसे एम. आय. डी. सी. पोलीस ठाणे, औरंगाबाद व बुंड गार्डन पोलीस ठाण्यामध्ये सूचना फलक दिसता येईल अशा जागी ठेवले नाही. उप समितीने निर्देश दिले की, फलक दिसता येतील अशा जागी ठेवले पाहिजे. त्याचबरोबर अटक व्यक्तींची तपशील नोंद व्यवस्थित ठेवली गेली असल्याचे निदर्शनास आले.

राजापूर पोलीस ठाणे रत्नागिरीमध्ये गेल्यावेळी तेथे स्वतंत्र नोंदवही ज्यामध्ये अटक व्यक्तींचे नाव, अटक वेळ व इतर तपशील नव्हती. संबंधित अधिकारी ज्याला सूचना पाळण्याचे आदेश दिल्यावर त्याने ताबडतोब आदेशांचे पालन केले, जे उप समितीला समाधानकारक होते.

भंडारा पोलीस ठाण्यामध्ये, निदर्शनास आले की, अदखलपात्र फिर्यादींची नोंदवही ज्यामध्ये फिर्यादींचे तपशील ठेवले जातात, ती ठेवली जाते. फिर्यादीला फिर्याद केल्याची, व अदखलपात्र फिर्यादीमध्ये, पोच पावती दिली होती. उप समितीला संबंधित अधिकाऱ्यांचा असा प्रयास स्तुतीस्पद वाटला ज्यामुळे पारदर्शकता ठेवली जाते. हवालातील व्यवस्थासुद्धा समाधानकारक होती. राज्यातील सर्व पोलीस ठाण्यांनी अशीच पारदर्शकता ठेवली पाहिजे असे मत दिले.

चेंबुर पोलीस ठाण्याला भेट दिली तेव्हा, जरी पोलीस कर्मचाऱ्यांनी सांगितले की, उच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे अटकेची माहिती योग्य रितीने व ताबडतोब अटक व्यक्तींच्या नातेवाईक/मित्रांना दिली गेली, ते सिद्ध करण्यासाठी त्यांच्याकडे कागदपत्री पुरावा उपलब्ध नव्हता. उप समितीने सुचित केले की, तशा प्रकारचा कागदोपत्री पुरावा ठेवला गेला पाहिजे. जर नातेवाईकास व्यक्तीशः सांगितले गेले असेल तर त्याचे स्वाक्षरीसहीत कागदपत्र उपलब्ध केले गेले पाहिजे, ज्यामुळे अटकेची माहिती दिली गेली याचा पुरावा असतो.

वैद्यकीय तपासणी अहवाल ताबडतोब उपलब्ध नसले तरी अटक व्यक्ती वैद्यकीय तपासणीसाठी घेऊन गेले हे इतर कागदपत्रावरून दिसून आले.

उप समितीने अहवालाच्या वर्षी जे कार्य हाती घेतले होते, त्याचा वार्षिक अहवाल दिला आहे, व त्याच्या प्रती राज्यातील पोलीस आयुक्त यांना पाठविल्या आहेत की, ज्यामुळे जे उप समितीने भेटीच्यावेळी केलेले निरीक्षण विचारात घेतले जावे.

## प्रकरण ४

**प्रशासकीय व न्यायिक सहाय्य :**

. महाराष्ट्र शासनाने शा. नि. गृ. वि. एच. आर. सी. १०९९/३७८/पोल-१४, दिनांक १५ जानेवारी २००० द्वारे महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग स्थापन केला. त्यानुसार एक अध्यक्ष व चार सदस्य असतील व आयोगाचे मुख्यालय मुंबई येथे आहे. आयोग ६ मार्च २००१ रोजी मा. राज्यपाल यांच्या स्वाक्षरीने स्थापन झाला. त्याचप्रमाणे अध्यक्ष आणि सदस्य यांनी पदभार स्वीकारला.

४.२. आयोगाचे सदस्य श्री. ए. डी. माने यांची प्रभारी अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली आणि श्री. एम. आर. पाटील, डॉ. विजय चिटणीस, श्री. सी. एल. थुल आयोगाचे सदस्य म्हणून कार्यरत होते, संपूर्ण वर्षभरात अध्यक्षांची जागा रिक्त होती.

**कर्मचारी**

४.३. आयोगाचे तीन शाखेतील कर्मचारी त्याच विभागात कायम होते, म्हणजे, प्रशासन शाखा सचिवांच्या अधिपत्याखाली, तपास शाखा, विशेष पोलीस महा निरिक्षक यांच्या अधिपत्याखाली व विधी शाखा प्रबंधकांच्या अधिपत्याखाली.

**कार्यालयाची जागा**

४.४. महाराष्ट्र शासनाने शा.नि. गृ.वि. एच.आर.सी. १०९९/३७८/पोल-१४, दिनांक १५ जानेवारी २००० नुसार, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचे मुख्यालय मुंबई येथे असेल असे नमूद केले. त्याप्रमाणे शासनाने विविध जागेबद्दल प्रस्ताव केला, जसे नविन प्रशासकीय इमारत, मंत्रालयासमोर, वरळी गव्हर्नमेंट ट्रान्सपोर्ट सर्व्हिस, अरूण चेंबर्स, ताडदेव, मुंबई, न्यू ॲडमिनिस्ट्रेटीव बिल्डिंग, बांद्रा (पूर्व) व ओल्ड कस्टम हाऊस, मुंबई येथे दिला.

४.५. शेवटी, शासन परिपत्रक क्रमांक जी. ए. ११०१/सी. नं. १५/२००१/२२, दिनांक २० जून २००२ द्वारे शासनाने २३८० चौरस फुट जागा ॲडमिनिस्ट्रेटीव स्टाफ कॉलेज बिल्डिंग, ९ हजारीमल सोमानी मार्ग, सी.एस.टी. समोर, मुंबई ४०० ००१, येथे आयोगाला दिली, ह्या जागेत पूर्वी राज्य वित्त आयोग कार्यरत होता. हा आयोग त्याच जागेमध्ये कार्य करीत आहे.

**साधने–**

४.६. सन २००३-०४ वर्षा दरम्यान, राज्य सरकारने रुपये १ करोड १९ लाख २५ हजार वित्तीय अनुदान दिले व एकूण खर्च रुपये १ करोड २१ लाख ९ हजार ४३७ एवढा होता.

## प्रकरण ५

आयोगाने निर्णय दिलेल्या दृष्टांतयुक्त प्रकरणे—

१. केस नं. ८५८/२००१ व केस नं. ८९०/२००१.

फिर्यादीचे नाव.—श्री. इलियाजभाई नायकवाडी व इतर.

प्रतिवादीचे नाव.—जिल्हा न्यायाधीश, सांगली पोलीस अधीक्षक, सांगली.

आदेशाचा दिनांक.—३० डिसेंबर २००३.

कोरम.—न्यायाधीश ए. डी. माने.

हकिकत.—मुस्लिम फिर्यादने कथन केले की, त्यांच्या पसंदीच्या कुठलाही धर्म पाळू शकण्याच्या त्याच्या अधिकाराचे उल्लघंन झाले आहे. फिर्यादीने सांगितले की काही लोकांनी त्यांना प्रार्थना करण्याच्या वेळी उपद्रव केला आणि त्यांना धमकावलेसुद्धा, त्यासाठी फिर्यादीने आयोगाला विनंती केली की पोलीस संरक्षण त्यांना देण्यास आयोगाने आदेश द्यावेत.

आदेशाचे सारांश.—या प्रकरणी जिल्हा न्यायाधीश व पोलीस अधीक्षक, सांगली यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला. सादर केलेल्या अहवालामध्ये प्रशासनाने जिल्ह्यातील कानून व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी केलेल्या कार्यवाहीचा तपशील दिला. अहवालाचे अवलोकन केल्यावर आयोगाचे समाधान झाले.

परिणाम.—प्रकरण समाप्त झाले.

२. केस नं. १०३२/२००२.

फिर्यादीचे नाव.—श्री. सोमा गोविंद जाधव.

प्रतिवादीचे नाव.—अधीक्षक, महिला भिक्षागृह, चेंबूर, मुंबई

आदेशाचा दिनांक.—७ जुलै २००३.

कोरम.—न्यायाधीश ए. डी. माने.

हकिकत.—दारिद्र्य गृह, चेंबूर मुंबई येथील कर्मचाऱ्यांना निवृत्तिवेतन, उपदान इ. निवृत्तीविषयक फायदे फिर्यादीला न भेटल्याबद्दल तक्रार.

आदेशाचा सारांश.—आयोगाने संचालक, महिलाभिक्षा गृहाकडून अहवाल मागविला. २६ नोव्हेंबर २००२ रोजी त्यांनी अहवाल पाठविला, त्यामध्ये अधीक्षक महिलाभिक्षा गृह यांनी आयोगाला आश्वासन दिले की, फिर्यादीला निवृतिवेतन, उपदान व इतर निवृत्तीविषयक फायदे याबद्दल सर्व देणे ताबडतोब देईल.

परिणाम.—निवृत्तीचे सर्व लाभ दिले जाईल, या प्रतीवादीकडून दिलेल्या आश्वासनामुळे, प्रकरण समाप्त करण्यात आले.

३. केस नं. २२०/२००१.

फिर्यादीचे नाव.—श्री. जे. एन. सदाशिव.

प्रतिवादीचे नाव.—उप कुलगुरु, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

आदेशाचा दिनांक.—२२ एप्रिल २००३.

कोरम.—न्यायाधीश ए. डी. माने.

हकिकत—सदर फिर्यादीमध्ये असे कथन केले गेले की, मुंबई विद्यापीठाशी संलग्न संस्था व व्यवस्थापन केंद्रे मागासवर्गीय उमेदवारांकडून दाखला देतेवेळी शिक्षण व इतर शुल्क घेतात. फिर्यादीने आयोगाचे लक्ष मुंबई विद्यापीठाच्या दिनांक २१ सप्टेंबर १९९१ च्या आदेशाकडे वेधले, ज्याद्वारे कॉलेज-विद्यापीठ, खाते मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून ज्यामध्ये नव बुद्धीस्ट, शेड्युल्ड ट्राईब व डी.टी./एन.टी. वर्गाचा समावेश आहे. दाखला/परीक्षेच्या वेळी शिक्षण शुल्क घेऊ शकत नाही. फिर्यादीपुढे विनंती करतो की जे शुल्क पूर्वीच घेतले गेले आहेत ते परत करण्यात यावेत.

आदेशाचा सारांश.—याबाबत मुंबई विद्यापीठ उप-कुलगुरू यांच्याकडून अहवाल मागविला गेला, त्यांच्या उत्तरामध्ये उप कुलगुरुंनी सविनय सांगितले की, ते या प्रकरणामध्ये कार्यवाही करीत आहेत व त्यांनी सर्व संबंधित महाविद्यालय, संस्थांना परिपत्रकाद्वारे कळविले आहे की, मागासवर्गीय उमेदवारांकडून शिक्षण शुल्क व इतर शुल्क घेण्यात येऊ नये.

परिणाम.—दोन्ही पक्षांनी आयोगापुढे करार करून खालीलप्रमाणे स्वीकार केला. उप-कुलगुरू, मुंबई विद्यापीठ हे मागासवर्गीय जातींना प्रवेश/परीक्षा शुल्क माफ करण्याचे कठोरतेने अंमलबजावणी करण्याचे आदेश जारी करतील. सदर आदेश दरवर्षी योजना पत्रकामध्ये प्रकाशित केला जाईल. आयोगाने आदेश पारित केल्याच्या सात दिवसांमध्ये उप-कुलगुरू संबंधित अधिकाऱ्यांना योग्य परिपत्रकांन्वये माहिती देतील. समझोता झाल्याने प्रकरण संपुष्टात आले.

४. केस नं. २९९/२००२

फिर्यादीचे नाव.—श्री. प्रशांत मोरे.

प्रतिवादीचे नाव.—पोलीस अधीक्षक, लातूर.

आदेशाचा दिनांक.—७ जुलै २००३.

कोरम.—न्यायाधीश ए. डी. माने.

हकिकत—श्री. आनंद मोरेचा काही अज्ञात माणसांनी खून केला. फिर्यादीने आरोप केला की आनंदचा खून त्याच्याच एका शितल देशमुखबरोबर असलेल्या प्रेमप्रकरणातून उद्‌भवला. फिर्यादी पोलीस चौकशीने संतुष्ट न झाल्याचे कारण असे की, पोलीस शितल देशमुख व तिच्या कुटुंबीयाकडे चौकशी करीत नव्हते. म्हणून फिर्यादीने प्रार्थना केली की सी.आय.डी. कडून योग्य चौकशी व्हावी.

आदेशाचा सारांश.—लातूर पोलीस अधीक्षकाकडून अहवाल मागितला गेला. अहवालामध्ये असे सादर केले की खुनामध्ये व शितल देशमुख यांच्यामध्ये काही संबंध दिसत नाही.

परिणाम.—मिळालेल्या अहवालाच्या आधारावर प्रकरण संपविले गेले.

**५. केस नं. १०६/२००१.**

फिर्यादीचे नाव.—श्री. विवेक पंडित, समर्थन.

प्रतिवादीचे नाव.—सचिव, कामगार खाते, महाराष्ट्र शासन.

आदेशाचा दिनांक.—१८ सप्टेंबर २००३.

कोरम.—न्यायाधीश ए. डी. माने.

हकिकत—फिर्यादीने आयोगाच्या लक्षात आणून दिले की, कामगारांना बंधनात ठेवण्याची प्रथा अद्याप चालूच आहे, जरी त्यावर बंदी आहे. फिर्यादीने एक छोटा मुलगा नरेश वारंग, दत्ताराम वारंग यांचा मुलगा याचे उदाहरण दिले जो एका श्रीकृष्ण कुलकर्णी याच्या गॅरेजमध्ये ज्याच्याकडून त्याच्या वडिलाने कर्ज घेतले होते त्या कर्जाची परतफेड म्हणून, काम करण्यासाठी विवश केले गेले. फिर्यादी योग्य अधिकारी, अर्थात कामगार आयुक्त यांच्याकडे गेला परंतु पुष्कळ स्मृतीपत्रक देऊनदेखील कुठलीही कार्यवाही केली गेली नाही, म्हणून फिर्यादी आयोगाकडे आला.

आदेशाचा सारांश.—आदेश, दिनांक १८ सप्टेंबर २००३ प्रमाणे आयोगाने मत दिले की, बंधनात ठेवलेला कामगार व बाल कामगार ही एक शक्तीमान समस्या आहे. जी पुन्हा पुन्हा कुठल्याही वेळी कोणत्याही धंद्यामध्ये किंवा व्यवसायामध्ये उत्पन्न होते म्हणून, आयोगाने शिफारस केली की, सर्व संबंधितांना, कामगारांना बंधनात ठेवण्याचे निर्मूलन करण्याचा अपेक्षित हेतू साध्य करण्यासाठी योग्य त्या मार्गदर्शक सूचना देण्यात याव्यात. आयोगाने असेही इच्छिले की मानवाच्या शिक्षण अधिकार या देशव्यापी कार्यवाही योजनेला गती दिली पाहिजे.

परिणाम.—आदेशाची प्रत मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्याकडे पाठवून योग्य ती कार्यवाही करून कृती अहवाल आयोगाला दोन महिन्यांत पाठवून द्यावा असे आदेश देण्यात आले.

**६. केस नं. १०५/२००१.**

फिर्यादीचे नाव.—श्री. विवेक पंडित, समर्थन.

प्रतिवादीचे नाव.—सचिव, कामगार खाते, महाराष्ट्र शासन, जिल्हा न्यायाधीश, चंद्रपूर.

आदेशाचा दिनांक.—२७ मे २००३.

कोरम.—एम. आर. पाटील.

हकिकत—या प्रकरणामध्ये फिर्यादीने एका बंधनात ठेवल्या गेलेला कामगार विश्वनाथ शेंडे यांची तक्रार आयोगाच्या लक्षात आणली, व त्याचे कुटुंबास मोहम्मद अली असगरअली सैय्यद याने त्यांना बंधनात राहणारे कामगार म्हणून काम करण्यास भाग पाडले. संबंधित अधिकारी यांना योग्य ती कार्यवाही करण्यासाठी विनंती केली गेली परंतु तहसीलदार यांनी एक पत्र देऊन सांगितले की तो विश्वनाथ शेंडे बंधनात काम करणारा कामगार नव्हता. म्हणून बंधनात राहिलेला कामगार मुक्त झाला म्हणून प्रमाणपत्र देता येत नाही.

आदेशाचा सारांश.—आयोगाने जिल्हाधिकारी व जिल्हा न्यायाधिश, चंद्रपूर यांना नोटीस बजावल्या. सर्व गोष्टींचा व परिस्थिती जसे उत्तर शपथपत्र व प्रती उत्तर फिर्यादीने सादर केले यामध्ये सांगितल्याप्रमाणे या सर्वांचा अभ्यास केल्यानंतर, आयोग या मतावर आले की, तो विश्वनाथ शेंडे खरोखर एक बंधनात असलेला कामगार होता व महाराष्ट्र शासनाने योग्य कारवाई करून विश्वनाथ शेंडे व त्याच्या कुटुंबियांना बॉन्डेड लेबर सिस्टीम आबोलिशिन ॲक्ट, १९७६ च्या तरतुदीप्रमाणे मुक्तता प्रमाणपत्र दिले पाहिजे व पुढची सर्व पाऊले उचलावी की ज्यामुळे बंधन कामगार प्रथा निर्मूलन होईल.

**७. केस नं. ६६५/२००३**

फिर्यादीचे नाव.—श्रीमती रजनी चंद्रकांत विभुते

प्रतिवादीचे नाव.—मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे.

आदेशाचा दिनांक.—१८ मार्च २००४

कोरम.—न्यायाधीश ए. डी. माने

हकीकत—या प्रकरणातील फिर्यादीस स्वेच्छारी रितीने सेवेतून हटविले जे तिच्या मानवी हक्कांचे उल्लंघन आहे म्हणून ती आयोगाकडे आली.

आदेशाचा सारांश.—मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांच्याकडून अहवाल मागविला. अहवालाचे अध्ययन व दोन्ही पक्षांची सुनावणीनंतर, आयोग अशा मतावर आले की फिर्यादी गैरकानूनी रितीने सेवेतून हटविला गेला होता.

परिणाम.—फिर्यादी सेवेत परत घेतला गेला.

**८. केस नं. ३७३/२००३**

फिर्यादीचे नाव.—मधुकर छेदांगी इंगोले

प्रतिवादीचे नाव.—पोलीस आयुक्त, अमरावती.

आदेशाचा दिनांक.—१३ जानेवारी २००४

कोरम.—न्यायाधीश ए. डी. माने

हकीकत—फिर्यादी शेती कामगार म्हणून एका अब्दुल मस्जिद, बदनेश, जिल्हा अमरावती याच्या शेतावर काम करीत होता. जेव्हा फिर्यादी न दिलेल्या मजुरी वसूल करण्यासाठी अब्दुल मस्जिदकडे गेल्यानंतर तो त्याऐवजी त्याला मारले गेले, जेव्हा तो बडनेरा पोलीस ठाणे येथे फिर्याद करण्यासाठी गेला, फिर्यादीने आरोप केला की संबंधित पोलीस कर्मचाऱ्यांनी प्रकरण दाबण्याचा प्रयास केला, व अब्दुल मस्जिद विरूद्ध गुन्हा दाखल करण्याचे टाळले. असे कथन आहे की फिर्यादीला धमकी दिली गेली की त्याने जर गुन्हा दाखल करण्यासाठी जोर दिला तर त्याला खोट्या प्रकरणामध्ये टाकले जाईल.

आदेशाचा सारांश.—पोलीस आयुक्त, अमरावती यांच्याकडून अहवाल मागविला गेला मिळालेल्या अहवालाप्रमाणे, आयोगाने मत व्यक्त केले की फिर्यादीची वैद्यकीय नोंद संशयास्पद दिसली. अहवालात फिर्याद नोंद करण्यासाठी नकार देण्याच्या मुद्यावर मौनधारण केलेले दिसले. म्हणून पुन्हा नोटीस देण्यात आली. त्यानंतर मिळालेल्या

अहवालात, आयुक्तांनी सांगितले की तेथे खरोखर संबधित पोलीस कर्मचाऱ्यांनी आपले कर्तव्य करण्यामध्ये लापरवाही केली होती व खात्यामध्ये योग्य ती कारवाई केली जात आहे.

परिणाम.—चुकणाऱ्या कर्मचाऱ्यांवर खात्यातील कारवाई केली गेली व फिर्यादीला त्याच्या मजुरीची थकबाकी पोच करण्यात आली. श्री. अब्दुल मस्जिद याच्याविरुद्ध योग्य गुन्हा दाखल सुद्धा करण्यात आला.

**९. केस नं. ६०५/२००१**

फिर्यादीचे नाव.—डॉ. आर. ए. खान

प्रतिवादीचे नाव.—जिल्हा न्यायाधीश अमरावती व पोलीस अधीक्षक, अमरावती.

आदेशाचा दिनांक.—१४ ऑगस्ट २००३

कोरम.—न्यायाधीश, ए. डी. माने

हकीकत—फिर्यादी आयोगाच्या निदर्शनात आणले की, प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे पुर्णानगर आसेगांव पोली ठाणे, अमरावती येथे ११ ऑगस्ट २००१ ला जे जातीय दंगा करण्यासाठी जबाबदार होते त्यांना पकडण्यात आले नव्हते. पोलिसांनी केलेल्या गोळीबाराबाबत न्यायीक चौकशी केली गेली नव्हती. कारण कोणत्याही बाजुला अपघात झाला नव्हता. फिर्यादीप्रमाणे, चौकशी करण्यास हवी होती.

आदेशाचा सारांश.—पोलीस अधीक्षक ग्रामीण, तसेच जिल्हा न्यायाधीश, अमरावती यांच्याकडून अहवाल मागविला गेला. अहवालाच्या आधारावर आयोगाने असा निष्कर्ष काढला की, जिल्हा न्यायाधीशांनी चुकीने गृहीत धरले की जेथे काही अपघात नव्हता तेथे न्यायालयीन चौकशी करण्याची गरज नव्हती. आयोगाने शिफारस केली की शासनाने परत वटहुकुम काढावा व त्यामध्ये शासनाने दिलेले आदेश गृह खाते खास वटहुकुम नं. एमआयएस/३१९९/सी आर/खास, दिनांक १० सप्टेंबर १९९९ पोलीस गोळीबार व होमगार्ड गोळीबार न्यायालयीन चौकशीविषयी दिलले आदेश पुन्हा देण्यात यावे.

**१०. केस नं. ९४०/२००१**

फिर्यादीचे नाव.—श्री. पी. के. नायर

प्रतिवादीचे नाव.—आर्थिक निर्देशक, एच.ए.एल.

आदेशाचा दिनांक.—१ सप्टेंबर २००३

कोरम.—न्यायाधीश, ए. डी. माने

हकीकत—फिर्यादी आयोगाकडे आले व त्यांच्यावर झालेल्या अन्यायाची तक्रार दिली की कित्येक वर्ष निवृत्त होऊन गेल्यानंतरही ग्रॅच्युइटी व भरपगार सुट्टी यातील फरक दिलेला नाही. फिर्यादी हिंदुस्तान अँटीबायोटिक्स लिमिटेड कंपनीचा कर्मचारी म्हणून निवृत्त झाला.

आदेशाचा सारांश.—प्रतिवादी कंपनी जरी भारत सरकारी कंपनी आहे व तांत्रिक आयोगाच्या न्याय कक्षेत येत नाही तरी सुद्धा आयोगाने प्रतिवादींना मानवी हक्काच्या उल्लंघनाबद्दल नोटीस दिली. आयोगापुढे सुनावणीच्या वेळी अध्यक्ष, एचएएल एम्प्लॉइज ग्रच्युटी फंड ट्रस्ट, पुणे हजर होते त्यांनी सविनय सादर केले की, आयोगाच्या हस्तक्षेपामुळे फिर्यादीची तक्रार मिटली, फिर्यादीने सुद्धा समाधान व्यक्त केले.

आदेशाचा सारांश.—पूर्तता झाली म्हणून केस बंद केली.

११. केस नं. ६५८/२००१

फिर्यादीचे नाव.—श्रीमती अनुराधा क्रिश्न रोडे

प्रतिवादीचे नाव.—पोलीस अधीक्षक, कोल्हापूर

आदेशाचा दिनांक.—२५ मार्च २००४

कोरम.—न्यायाधीश, ए. डी. माने

हकीकत—फिर्यादीने आरोप केला की, तिला त्रास दिला जात होता व तिच्या पतीवर खोटे आरोप लावले गेले.

आदेशाचा सारांश.—आयोगाने महाराष्ट्राच्या डायरेक्टर जनरल ऑफ पोलीस, मुंबई यांना शिफारस केली की, मानवी हक्क संरक्षण करण्यासाठी व जोपासना करण्यासाठी, त्यांनी योग्य ते निर्देश, आयोगाने कोड ऑफ क्रिमिनल प्रोसिजर, धारा १०७ प्रमाणे कार्यवाही करण्याच्या प्रकरणामध्ये जे निरीक्षण केले आहे, त्याप्रमाणे पोलीस कर्मचाऱ्यांना दिले पाहिजेत. आयोगाने आदेश दिल्यापासून सात दिवसांच्या आत कृती अहवाल आयोगाला सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

१२. केस नं. ७९९/२००३

फिर्यादीचे नाव.—प्रशांत

प्रतिवादीचे नाव.—मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, नाशिक

आदेशाचा दिनांक.—१ ऑक्टोबर २००३

कोरम.—न्यायाधीश, ए. डी. माने

हकीकत—फिर्यादीने आरोप केला की, तो जरी मागासवर्गीय वर्गाच्या उमेदवारामध्ये पहिला होता. जिल्हा परिषद, नाशिक यांनी त्याची नेमणूक या आधारावर केली नाही कारण, त्याचे नाव जनरल मेरीट लिस्टमध्ये होते व मागासलेल्या जाती दर्जामध्ये नव्हते.

आदेशाचा सारांश.—विभागीय आयुक्त, नाशिक व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना नोटीस दिली गेली. मिळालेल्या अहवालाप्रमाणे असे निर्देशनात आले की जे मागासलेले उमेदवार कमी मार्क्स मिळूनही नेमणुक झाली होती. परंतु फिर्यादीची नेमणूक त्याचे नांव मागासलेल्या जाती जमातीच्या यादीमध्ये नसल्याने झाली नव्हती. फिर्यादीची दिनांक २९ सप्टेंबर २००३ च्या आदेशाप्रमाणे लॅबोरेटरी टेक्नीशियन म्हणून जिल्हा परिषद, गोंदिया, नागपूर येथील रेव्हेन्यू खात्यामध्ये नेमणूक झाली.

परिणाम.—फिर्यादीची नेमणूक झाल्याने केस बंद केली गेली.

१३. केस नं. ११८७/२००२

फिर्यादीचे नाव.—जिजाबाई दशरथ चिंचोळकर

प्रतिवादीचे नाव.—जिल्हाधिकारी, अकोला.

आदेशाची दिनांक.—९ मार्च २००४

कोरम.—न्यायाधीश ए. डी. माने

हकीकत—फिर्यादीने आरोप केला की, जी जमीन तिच्या नवऱ्याच्या नावावर होती ती गैरकानूनी पद्धतीने दुसऱ्या कोणाच्या नावावर करण्यात आली.

आदेशाचा सारांश.—जिल्हाधिकारी अकोला यांच्याकडून अहवाल मागितले गेले त्यामध्ये त्याने सांगितले की, वाडेगांव येथील तलाठ्याने चौकशीशिवाय व तहसिलदाराच्या आदेशाशिवाय दुसऱ्या कोणाचे नाव हक्काच्या नोंदीमध्ये नोंदविले. जिल्हाधिकारी यांना निर्देश दिले गेले की त्यांनी संबंधित तलाठ्याच्या विरुद्ध कार्यवाही करावी की, ज्याने आपल्या पदाचा गैरवापर केला व योग्य ती कार्यवाही करून आयोगाला जे अहवाल सादर केलेले आहेत त्यामध्ये दिलेल्या वस्तुस्थितीच्या आधारावर नोंद सुधारावी. असे पण आदेश देण्यात आले की कृती अहवाल या हप्त्यामध्ये आयोगाला पाठवावा.

## जोडणी अ

सुप्रिम कोर्टाच्या डी. के. बासू प्रकरणामध्ये दिलेली अकरा मार्गदर्शक तत्त्वे—

१. जो पोलीस कर्मचारी अटक व अटक व्यक्तीची चौकशी हाताळत असेल त्याने अचूक दिसेल असे स्पष्ट ओळखपत्र ठेवले पाहिजे, त्यामध्ये नाव व पद दाखविले गेले पाहिजे. अशा सर्व पोलीस कर्माचाऱ्यांना तपशील जे अटक व्यक्तीची चौकशी करीत असतात, नोंदवहीमध्ये नोंद झाली पाहिजे.

२. जो पोलीस अधिकारी अटक व्यक्तीची अटक करीत असेल त्याने अटकेच्यावेळी टिपण/मेमो बनविला पाहिजे, जो मेमो कमीत कमी एक तरी साक्षीदाराने साक्षीत केला पाहिजे, जो अटक व्यक्तीच्या कुटुंबाच्यापैकी पाहिजे किंवा जेथून अटक झाली आहे त्या स्थळातील माननीय व्यक्ती असली पाहिजे. ते अटक व्यक्तीने स्वाक्षरी केलेले असले पाहिजे व त्यामध्ये अटकेची दिनांक व वेळ असली पाहिजे.

३. अटक व्यक्ती किंवा पकडलेली व्यक्ती पोलीस ताब्यामध्ये असेल किंवा चौकशी केंद्र किंवा कैदखान्यामध्ये असेल, त्याच्या मित्राला किंवा नातेवाईक किंवा दुसरा माणूस त्यांना ओळखणारा किंवा त्याच्या भलाईमध्ये रस

असणारा, जेवढे शक्य असेल तेवढयांना कळविले पाहिजे की ती व्यक्ती अटक आहे किंवा पकडून ठेवलेली आहे, व कोणत्या ठिकाणी आहे, परंतु अटक मेमोचा साक्षीदार स्वतः अटक व्यक्तीचा मित्र किंवा नातेवाईक असेल तर तसे सांगण्याची गरज नाही.

४. अटक व्यक्तीच्या अटकेची वेळ, अटकेची जागा व अटक व्यक्तीला जेथे ताब्यामध्ये ठेवले आहे हे सर्व पोलिसांनी जेथे अटक व्यक्तीचा मित्र व नातेवाईक रहात असेल तेथे कळविले पाहिजे, जो जिल्ह्याच्या किंवा शहराच्या बाहेर असेल तर विधी मदत संस्था व संबंधित पोलीस ठाण्यामार्फत अटकेच्या आठ ते बारा तासामध्ये तारेने कळविले पाहिजे.

५. अटक व्यक्ती अटकेच्या नंतर जेवढे लवकर होईल तेवढे त्याला त्याच्या हक्काची जाणीव करून दिली पाहिजे की त्याच्या अटकेची किंवा पकडून ठेवले आहे त्याची माहिती कोणाला तरी दिली पाहिजे.

६. जेथे अटक केले आहे तेथे नोंदवहीमध्ये अटकेची नोंद केलेली पाहिजे, ज्यामध्ये अटकेची माहिती अटक व्यक्तीच्या मित्राला दिलेली आहे. त्या मित्राचे नाव व ज्या पोलीस अधिकाऱ्यांच्या ताब्यामध्ये अटक व्यक्ती आहे, त्या पोलीस अधिकाऱ्यांचा तपशील दिलेला असला पाहिजे.

७. अटक व्यक्ती, जेथे तो विनंती करीत असेल तेथे त्याची अटकेच्या वेळी तपासणी झाली पाहिजे व ज्या काही छोट्या व मोठ्या जखमा त्याच्या/तिच्या शरीरावर असतील तर त्याची त्यावेळी नोंद झाली पाहिजे. निरीक्षण मेमो अटक व्यक्ती व अटक करणारा पोलीस अधिकारी या दोघानी स्वाक्षरी केलेला असला पाहिज व त्याची प्रत अटक व्यक्तीला दिलेली असावी.

८. अटक व्यक्तीची वैद्यकीय तपासणी त्याच्या अटकेतील प्रत्येक ४८ तासाने शिकलेल्या डॉक्टरकडून झाली पाहिजे, जो डॉक्टर मान्यताप्राप्त सूची, संबंधित निर्देशक, राज्य व केंद्रीय प्रदेश, आरोग्य सेवा यांनी नेमणूक केलेला असावा. निर्देशक, आरोग्य सेवा, यांनी तशी सूची सर्व तालुके व जिल्ह्यांकरिता सुद्धा तयार करावी.

९. सर्व कागदपत्रांच्या प्रती त्यामध्ये अटक मेमो, वरती उल्लेख केलेला, न्यायाधिशांनी त्यांच्या नोंदणीसाठी पाठविल्या पाहिजेत.

१०. अटक केलेल्या व्यक्तीला त्याच्या चौकशीच्या वेळी त्याच्या वकीलांना भेटण्याची परवानगी जरी संपूर्ण चौकशीच्यावेळी नसली तरी, परवानगी दिली पाहिजे.

११. सर्व जिल्हे व राज्य मुख्यालयात एक कंट्रोल रूम पुरविला पाहिजे, जेथे अटक करणाऱ्या अधिकाऱ्याने अटक व्यक्तीच्या अटकेबद्दल व जेथे ताब्यात ठेवलेल्या जागेबद्दल माहिती अटकेच्या बारा तासाच्या आत दिली पाहिजे व पोलीस कंट्रोल रुममध्ये दिसेल अशा सूचना फलकावर प्रदर्शित केल्या पाहिजे.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई